Mandai 2021-22 anilturup

मुख्याधिक्षक मंडई / ... / मंडई / ...
जावक क्रमांक १३/मंडई/ ....
दिनांक : १/९/२०२२

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**मंडई कार्यालय**

मा. मुख्यलेखापाल आपणे कडे सं

## ऑफलाईन लिलाव प्रक्रिया जाहिर प्रसिध्दीकरण

सोलापूर शहर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या चिप्पा मंडई मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ या चे कलम ७९ अन्वये व मालमत्ता हस्तांतर नियमास अधिन राहून खुले ओटे निश्चती तारखेपासून ११ महिने करिता नवीन ओटे भाड्याने देण्याकामी ऑफलाईन लिलाव प्रक्रिया पध्दतीने करण्याकामी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर दि.०२/०९/२०२२ पासून पाहणेस उपलब्ध आहेत.

**कामाचे नाव :** - शहर सोलापूर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या या चिप्पा मंडई मधील नवीन ओटे ऑफ लाईन लिलाव प्रक्रिया जाहिर प्रसिध्दी करणे बाबत.

| अ.क्र. | मार्केटचे नाव | ओट्यांची संख्या | १ ओट्याचे क्षेत्रफळ | १ ओट्यासाठी दरमहा भाडे |
|---|---|---|---|---|
| 1 | चिप्पा मंडई | १६८ | ओटा (४ फुट **X** ४ फुट) | ४००/- |

सदरचे ऑफ लाईन लिलाव प्रक्रिया दि.०२/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते ०६.०० वाजेपर्यंत घेण्यात येईल.

सदर ऑफ लाईन लिलाव प्रक्रियेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची छाननी दि.०२/०९/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत करण्यात येईल.

मा. सह. आयुक्त यांच्या मान्यतेने

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

मुख्याधिक्षक मंडई

मुख्याधिक्षक
मंडई विभाग
सोलापूर महानगरपालिका

Date: 31-08-2022

मुख्याधिक्षक मंडई विभाग
जावक क्रमांक १३/मंडई/ १६५
दिनांक : 30/ ८ /२०२१

## शर्ती व अटी

1. सदर ओटा ज्या कारणासाठी घेतलेला आहे.त्याच कारणासाठी वापर करावयाचा आहे.
2. सदरच्या जागाची मुदत 11 महिन्या करीता असेल.
3. मार्केट मधील ओट्यांची वेळ सकाळी ७ ते रात्री 10 पर्यंत असेल. त्यांना निर्देशित केलेल्या वेळेमध्ये व्यवसाय करायचा आहे.आणि वेळ संपल्या नंतर आपणास देण्यात आलेल्या जागेवर माल ठेवता येणार नाही.
4. सदर जागेचा परिसरातील स्वच्छता ठेवणे ही संबधीत ओटे धारकांचे काम आहे.
5. ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे याची जबाबदारी ओटे धारकांची असेल.
6. जागेच्या परिसरातील कचरा घंटागाडी मध्ये टाकणे याची जबाबदारी ओटे धारकांची असेल.
7. सदर जागा वापरत असलेल्या मालाची जबाबदारी संबधीत ओटे धारकाची असेल.
8. सदर ओट्यांचे ठरलेले दर महाभाडे दरमहा 10 तारखेच्या आत भरावयाचे आहे.त्या बाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.
9. गाडयाचे भाडे मुदतीत न भरल्यास दरमहा 2 % इतके व्याजासह आकारणी करण्यात येईल.
10. ओट्याबाबत वाद निर्माण झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधिल मालमत्ता संपादन.करण्याचा संबधीताच्या महानगरपालिकेचा अधिकार याबाबतचे संबंधीत तरतुदी व तद्अनुषंगीक तरतुदीस अनुसरून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांना आहेत.
11. सदर ओटे महापालिकेस सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जेव्हा कोणत्याही कारणास्तव जरुरी पडेल तेव्हा सदरची जागा ओटे धारकांस नोटीस दिल्यापासून 1 महिण्याच्या आत विना तक्रार महापालिकेस कुठल्याही प्रकारची तोषिस अथवा खर्च होवू न देता रिकामे करून देण्याचे आहे. त्याबाबत ओटेधारकांस कोणतेही नुकसान भरपाई मागणेचा अधिकार राहणार नाही. जर म.न.पा.स अशा प्रसंगी ओट्याची जागा ताब्यात घेणेकामी नाईलाजाने खर्च करावा लागल्यास तो खर्च ओटेधारकाकडून वसूल करण्याचा अधिकार म.न.पा.स आहे.
12. सदर ओट्यावर लागणारी इले.कनेक्शन,मीटर,इले.फिटिंग,पंखे ,टयुब,वगैर, साहित्य धारकांने स्वखर्चाने लायसन्सड इलेक्ट्रिशियन यांचेकडून करून घ्यावयाचे आहे. दरमहाचे इलेक्ट्रीक बील परस्पर महाराष्ट्र वीज मंडळाकडे ओटेधारकांने भरावयाचे बंधनकारक आहे.
13. सदर ओट्याची जागा पोट-भाड्यानी देता येणार नाही, अथवा अन्य प्रकारे हस्तांतर ,गहाण,दान, बक्षीस,गुडविल, अथवा कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर प्रस्थापित करता येणार नाही व अन्य रितीने परस्पर महापालिकेच्या परवानगी शिवाय तबदील करता येणार नाही,ही सदर भाडेकरारपत्राची एक अविभाज्य व महत्वपूर्ण अट गाडेधारकांना मान्य असेल.. अन्यथा या अटीपैकी कोणतीही शर्ती व अटीचे भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर जागेवरचा असलेला हक्क रद्द केला जाईल व सदर जागा ताब्यात. घेण्यात येईल. तसेच भरलेली डिपॉझिट रक्कम म.न.पा.कडून जप्त करण्यात येईल त्याबदल ओटे धारकांची कोणतीही तक्रार करणार नाही.
14. महापालिकेने नेमलेले अधिकार व सेवकवर्ग यांना केव्हाही जागा पाहण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार राहील व त्यांनी केलेल्या सूचनाचे पालन ओटे धारकांने करणे अनिवार्य आहे.

15. सदर जागावर कोणत्याही नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणाने आग व इतर कोणत्याही कारणाने नुकसान झाल्यास किंवा केल्यास ती नुकसान भरपाई भरून देण्याची जबाबदारी संबधीत ओटे धारकवर राहिल.

16. आजूबाजूच्या इतर ओटे धारकांस उपद्रव्य होईल व आजूबाजूस जवळपास सार्वजनिक आरोग्यच्या दृष्टीने घाण / अनारोग्यदायी परिस्थिती निर्माण होईल असे वर्तन ओटे धारकाने करता कामा नये.तशी ओटे धारकांनी काळजी घेतली पाहिजे.

17. सदर ओटे धारकांची मुदत संपताच सदरची जागा महापालिकेच्या ताब्यात सुस्थितीत पणे दिला पाहिजे.

18. सदरची ओट्याची जागा म.न.पा.कडून भाड्याने घेतल्या नंतर म.न.पा.स पूर्व कल्पणा न देता परस्पर अन्य व्यक्तीस अथवा संस्थेस विक्री करणे अथवा भाड्याने देण्याचा व्यवहार करणार नाही,असे ओटे धारकांवर बंधणकारक असेल,भाड्याने / विक्री केल्याचे पुरावे उपलब्ध झाल्यास अथवा तक्रार येईल ते सिध्द झाल्यास फसवणूकीच्या गुन्ह्यास पात्र राहिल.

19. सदर धारकास **३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम** म्हणून भरावे लागतील. सदर अनामत रक्कम लिलावाच्या दिवशी भरून ती जागा निश्चित करावी लागेल.

20. लिलाव मध्ये भाग घेण्यासाठी आधार कार्ड, PAN कार्ड, शॉप एक्ट् लायसन्स यांच्या तीन स्व साक्षांकित प्रती, तीन फोटो या कागदपत्रांची छाननी करावी लागेल.

21. ओटा फक्त भाजी व्यवसायासाठी आहे. इतर कोणताही व्यवसाय तेथे करता येणार नाही. सदर ओट्यामध्ये अर्जदार आणि त्याचे नजीकचे कुटुंबीय यांना व्यवसाय करता येईल.

22. विक्रीचा माल फक्त देण्यात आलेल्या ओट्यामध्ये ठेवणे बंधनकारक असून इतर मोकळी जागा त्यासाठी वापरता येणार नाही.

23. सदर ओट्यामध्ये स्फोटके अथवा ज्वालाग्राही पदार्थ ठेवता येणार नाहीत.

24. सदर ओट्याचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगांपासून मुक्त असला पाहिजे.

25. उपयोगात आणावयाची मापे आणि काटे हि सक्षम अधिकार्याकडून प्रमाणित केलेली हवीत.

26. सदर ओट्याची दुरुस्ती आणि निगा मंजूर ओटेधारकाने स्वखर्चाने करणे बंधनकारक आहे. सदर ओट्यामध्ये कोणताही फेरबदल करवयाचा नाही.

27. सदर ओट्यांची मुदत संपताच करारपत्र संपुष्टात येईल.

28. कोणत्याही ओटेधारकांना गिर्हाईक यांच्या आकर्षणसाठी कर्णकर्कश ध्वनीचा आणि सबंधित साहित्याचा वापर करता येणार नाही.

आयुक्त

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर